**गोपनीय**

**क्र.मुंमप्रविप्रा/बैठक/१४०**

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : १३ जून, २०१६

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक ०३ जून, २०१६ (शुक्रवार) रोजी झालेल्या १४०व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

सन्माननीय सदस्यांनी याबाबतीत काही हरकती असल्यास कृपया कळवाव्यात ही विनंती.

१३/६/१६
**सचिव,**
**कार्यकारी समिती**

प्रति,

सर्व सदस्य व निमंत्रित

**प्रत अग्रेषित :-**

मुं.म.प्र.वि. प्राधिकरणाचे अधिकारी

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १४०व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| **दिनांक** | **:** | **०३ जून, २०१६ (शुक्रवार)** |
| **वेळ** | **:** | **दुपारी ३.०० वाजता** |
| **सभास्थान** | **:** | **सहयाद्री राज्य अतिथीगृह,<br>बी.जी.खेर मार्ग,<br>मलबार हिल,<br>मुंबई - ४०० ००६.** |

**उपस्थित सदस्य :**

| | |
|---|---|
| श्री. देवेंद्र फडणवीस<br>माननीय मुख्यमंत्री | अध्यक्ष |
| श्री. प्रकाश मेहता<br>गृहनिर्माण मंत्री | सदस्य |
| श्रीमती स्नेहल आंबेकर<br>मुंबईच्या महापौर | सदस्या |
| श्री. प्रकाश बिनसाळे<br>विधानपरिषद सदस्य | सदस्य |
| श्री. यशोधर फणसे<br>अध्यक्ष, स्थायी समिती व<br>नगरसेवक,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री. दिलीप पटेल<br>नगरसेवक,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री. नितीन करीर<br>प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन | सदस्य |
| श्री. अजोय मेहता<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री. भुषण गगराणी<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको | सदस्य |
| श्री. यु.पी.एस. मदान<br>महानगर आयुक्त | सदस्य-सचिव |

**निमंत्रित :**

श्री. सुरेश टोकरे
अध्यक्ष,
रायगड जिल्हा परिषद

बैठकीच्या सुरुवातीस, मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांचे महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या वतीने स्वागत केले.

श्री. भूषण गगराणी, व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांचे "पदसिध्द सदस्य" म्हणून स्वागत व अभिनंदन केले.

तसेच श्री. संजय भाटीया, माजी व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी प्राधिकरणाचे "पदसिध्द सदस्य" म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

त्यानंतर, विषयपत्रिकेतील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ :** **दिनांक २१ मार्च, २०१६ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मागील (१३९व्या) बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ :** **दिनांक २१ मार्च, २०१६ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मागील (१३९व्या) बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यवाही अहवालाची नोंद प्राधिकरणाने घेतली.

**बाब क्र.३ :** **मेट्रो मार्ग-४ वडाळा - घाटकोपर - मुलुंड - ठाणे - कासारवडवली मार्गाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास मान्यता देणे आणि लवकरात लवकर अंमलबजावणीकरीता शासनाची मान्यता घेण्यासाठी प्राधिकरणाची मान्यता मिळण्याबाबत.**

३.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाच्या दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी झालेल्या १३८व्या बैठकीत तसेच दिनांक ०६ ऑक्टोबर, २०१५ रोजी झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत मुंबई मेट्रो मार्गांची पुढील ३ ते ४ वर्षात प्रस्तावित ११८ कि.मी. लांबीच्या उन्नत मेट्रो मार्गांची त्वरित अंमलबजावणी करण्यास मान्यता मिळाली आहे. या उन्नत मेट्रो मार्गांची त्वरीत

अंमलबजावणी करण्याकरीता अंदाजे रु.३५,४०० कोटीस (रु.३०० कोटी प्रती कि.मी. प्रमाणे) प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. तसेच मेट्रो मार्ग -२-अ दहिसर (पूर्व) - डी.एन.नगर (१८.५८९ कि. मी.) आणि मेट्रो मार्ग-७ अंधेरी (पूर्व) - दहिसर (पूर्व) (१६.५०० कि.मी.) या प्रकल्पाला मान्यता मिळाली आहे. तसेच मेट्रो मार्ग - ७ अंधेरी (पूर्व) - दहिसर (पूर्व) या मार्गासाठी कंत्राटदार नेमण्याचे कार्य पूर्ण झाले आहे. मेट्रो मार्ग-२-अ दहिसर (पूर्व) - डी.एन.नगर या प्रकल्पाची अंमलबजावणी (Deposit Work) या तत्वावर दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित (DMRC) मार्फत करण्यात येत असून या मार्गाच्या स्थापत्य बांधकामासाठी दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित यांनी मागविलेल्या निविदा खुल्या करण्यात आल्या असून लवकरच कंत्राटदार नियुक्त करण्यात येईल.

३.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळ यांनी सादर केलेल्या मेट्रो मार्ग-२ चा टप्पा-२-ब डी.एन.नगर - मंडाले या मेट्रो मार्गाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास प्राधिकरणाच्या १३९व्या बैठकीत मान्यता मिळाली आहे. त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळाने मे, २०१६ मध्ये सादर केलेल्या मेट्रो मार्ग-४ - वडाळा-घाटकोपर-मुलुंड-ठाणे-कासारवडवली या मेट्रो मार्गाच्या सविस्तर प्रकल्प अहवाल आणि त्यातील ठळक वैशिष्टये जसे की, मार्गाची लांबी, स्थानके, मेट्रो मार्गाची रचना, दैनंदिन प्रवासी संख्या, कार डेपो प्रकल्पासाठी लागणारी कायमस्वरुपी तसेच तात्पुरत्या वापरासाठी लागणारी जमीन, प्रकल्प राबविण्याचा कालावधी, अंदाजित किंमत इ. बाबत सादरीकरण करुन त्याबाबत माहिती दिली.

३.३ प्रकल्प पूर्णत्वाची किंमत रु.१४,५४९/- कोटी असून त्यापैकी रु.१,८३२/- कोटी खर्च भूसंपादनासाठी लागणार आहे असे दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळ यांनी प्रस्तावित केले आहे. यावर माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मेट्रो मार्ग-२-अ, २-ब आणि मार्ग-७ या प्रकल्पासाठी शिफारस केलेल्या भाडेदराप्रमाणे दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळ यांनी सदर प्रकल्पाकरीता रु.१०, २० आणि ३० असे भाडे दर प्रस्तावित केले आहेत. महानगर आयुक्त यांनी अशीही माहिती दिली की, मेट्रो-२-अ, २-ब, मेट्रो-७ आणि मेट्रो-४ या मार्गांचे तिकीट एकत्रिकरण होत असून त्याची लांबी सुमारे ९३ कि.मी. पर्यंत असणार आहे. त्यामुळे वरील सर्व बाबींचा विचार करुन मेट्रो मार्गांचे भाडे दर खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात आलेले आहेत :-

| ***अंतर (कि.मी.)*** | ०-३ | ३-१२ | १२-१८ | १८-२४ | २४-३० | ३०-३६ | ३६-४२ | >४२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ***भाडे (रु.)*** | १० | २० | ३० | ४० | ५० | ६० | ७० | ८० |

..४/-

वर नमूद केलेल्या भाडे दरांमध्ये सेंट्रल मेट्रो कायदा, २००९ (Central Metro Act) नुसार भाडे निर्धारण समिती सुधारणा करु शकेल.

३.४ मेट्रो मार्ग-४ -वडाळा-घाटकोपर-मुलुंड-ठाणे-कासारवडवली या मेट्रो मार्गामुळे शहराला व नागरिकांना विविध फायदे होतील. सन २०३१ पर्यंत सुरुवातीस प्रतिदिन सुमारे १२.१३ लाख प्रवाशांना वातानुकूलीत, सुरक्षित, आरामदायक प्रवासाचे फायदे उपलब्ध होतील, तसेच वेळेची बचत, इंधन बचत, वाहन खर्च, प्रवासास लागणाऱ्या वेळेमध्ये बचत होऊन रस्त्यावरील दुर्घटना, ध्वनी व हवेतील प्रदूषण कमी होईल.

३.५ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, स्थापत्य बांधकामावरील लागणारा खर्च रु.५,०४७ कोटी हा प्राधिकरणाच्या निधीमधून करण्यात येईल तसेच प्रणाली (System) खरेदी करण्यासाठी व्दिपक्षीय / बहुपक्षीय / आंतरराष्ट्रीय / अंतरदेशीय वित्तीय संस्थेमार्फत कर्ज स्वरुपात घेण्याचे प्रस्तावित आहे. तसेच एकूण केंद्रीय कराकरीता ५०% रक्कम प्राधिकरणामार्फत उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे. या प्रकल्पासाठी उर्वरीत ५०% केंद्र शासनाचा कर तसेच १००% राज्य शासनाचा कर आणि जमिनीची किंमत राज्य शासनाकडून बिनव्याजी कर्ज स्वरुपात उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे. तसेच प्रणाली खर्चापैकी ८०% रक्कम कर्ज स्वरुपात घेऊन उर्वरित २०% रक्कम प्राधिकरणामार्फत उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे.

३.६ वरील आर्थिक सहभागाच्या सारांशाची माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सदर प्रकल्पासाठी प्राधिकरणामार्फत एकूण सुमारे रु.६,९४० कोटी, राज्य शासनामार्फत रु.३,६९३ कोटी तसेच जागतिक बँक / एशियन विकास बँक / जपान आंतरराष्ट्रीय सहकार्य संस्था इ. आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थेमार्फत कर्ज सहाय्य म्हणून रु.३,९१६ कोटी इतका निधी उभारावा लागणार आहे.

३.७ मेट्रो मार्ग-४ वडाळा-घाटकोपर-मुलुंड-ठाणे-कासारवडवली या मेट्रो मार्गाची त्वरीत अंमलबजावणी करण्याकरीता स्थापत्य कामासाठी लागणारा निधी प्राधिकरणाने खर्च केल्यास बहुपक्षीय वित्तीय संस्थांकडून संपूर्ण कर्ज प्राप्त होण्यास लागणारा कालावधी आणि दोन वर्षाची चलनवाढ लक्षात घेता सदर पर्याय सोईस्कर, वेळ वाचविणारा आणि वाजवी प्रस्ताव आहे असे वाटते.

३.८ वरील प्रस्तावावर चर्चा करताना मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी मेट्रो मार्गावर दर दोन मिनिटात गाडी चालविण्याची क्षमता असणे आवश्यक आहे असे सांगितले. त्यावर महानगर आयुक्त यांनी स्पष्टीकरण देताना असे सांगितले की, सुरुवातीचा दैनंदिन प्रवास आणि गर्दीचा विचार करुन ३.७५

प्रति मिनीट असे प्रस्तावित करण्यात आले आहे. परंतू, या मेट्रो मार्गाची संपूर्ण प्रणालीची क्षमता ९० सेकंद हेडवेचा विचारात घेऊन करण्यात आली आहे.

३.९ प्राधिकरणाचे सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे, विधान परिषद सदस्य यांनी सदर मेट्रो मार्गाच्या प्रस्तावित भाडेदराविषयी विचारणा केली, यावर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्रस्तावित भाडेदरात सेंट्रल मेट्रो कायदा, २००९ (Central Metro Act) नुसार भाडे निर्धारण समिती स्थापन करुन भाडे दरामध्ये सुधारणा करण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच गरज भासल्यास मेट्रो प्रकल्प कार्यरत करण्यापूर्वी प्रस्तावित भाडे दरामध्ये प्राधिकरणाकडून सुधारणा करण्यात येतील.

३.१० प्राधिकरणाचे सदस्य श्री.भूषण गगराणी, व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी रेल्वे वाहतुकीवरचा ताण कमी करण्यासाठी तळोजा ते कल्याण हा मार्ग सार्वजनिक परिवहन व्यवस्थेने जोडण्याची गरज आहे असे सांगितले. यावर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सर्वकष परिवहन अभ्यासाच्या शिफारसीनुसार सदर मार्गाची तपासणी करुन याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

३.११ मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी १७२ कि.मी. मेट्रो मार्गाच्या सविस्तर प्रकल्प अहवालाच्या सद्य:स्थितीबाबत तसेच छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ जलद परिवहन व्यवस्थेने जोडण्याबाबत विचारणा केली. यावर महानगर आयुक्त यांनी अशी माहिती दिली की, मुंबई आणि नवी मुंबई विमानतळ जोडणीकरीता प्राधिकरणामार्फत अंधेरी ते पनवेलपर्यंतचा मेट्रो मार्ग प्रस्तावित करण्यात आला होता. त्यापैकी अंधेरी ते मानखुर्द पर्यंतचा सविस्तर प्रकल्प अहवाल प्राधिकरणामार्फत या अगोदरच पूर्ण करण्यात आला आहे. परंतू मानखुर्द ते नवी मुंबई विमानतळ जोडणीच्या मार्गिकेबाबतचा निर्णय सिडकोकडून अद्याप प्रलंबित आहे. यावर सिडकोने निर्णय घेतल्यास पुढील मार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल लवकरात लवकर तयार करुन घेण्यात येईल. प्राधिकरणाचे सदस्य श्री.नितीन करीर, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी असे सांगितले की, MRVC मार्फत छत्रपती शिवाजी टर्मिनस ते पनवेल दरम्यान जलद उपनगरीय रेल्वे मार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल अद्यावत करण्याचे काम मे.राईट्स मार्फत चालू आहे. याच्यातला काही भाग विमानतळ मेट्रो करीता वापरता येईल.

३.१२ प्राधिकरणाचे सदस्य श्री. प्रकाश मेहता, गृहनिर्माण मंत्री यांनी श्री.किरीट सोमय्या, खासदार यांनी मार्गिकेमध्ये सुचविलेले बदल सदर अहवालामध्ये अंतर्भूत केल्याबाबत चौकशी केली. यावर महानगर आयुक्त यांनी अशी माहिती दिली की, सुचविलेल्या बदलांचा अहवालामध्ये समावेश केला असून मार्गिका अमर महल जंक्शन वरुन बॅरिस्टर नाथ पै (९० फुटी रोड) मार्गे एल.बी.एस. कडे जाते.

३.१३ मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी सदर मार्गिकेमध्ये असणाऱ्या बस स्थानकांच्या एकात्मीकरण संदर्भात विचारणा केली असता महानगर आयुक्त यांनी असा खुलासा केली की, सदर एकात्मीकरण करण्याचा प्रस्ताव हा मेट्रो मार्ग-२-अ, २-ब, ७ आणि मेट्रो-४ मध्ये केला असून त्यांचा वाणिज्यिक विकास करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

प्राधिकरणाचे सदस्य श्री.नितीन करीर, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी अशी माहिती दिली की, महानगर प्रदेशातील बेस्ट, उपनगरीय रेल्वे, मेट्रो रेल्वे, मोनोरेल इ. मध्ये तिकीट एकात्मीकरण पध्दतीची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने काम प्रगतीपथावर आहे. ज्यासाठी उपनगरीय रेल्वेनी अगोदरच संमती दर्शविली आहे.

३.१४ प्राधिकरणाचे सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे, विधान परिषद सदस्य यांनी माथेरान रोपवे कामाच्या प्रगतीबाबत विचारणा केली असता अति.महानगर आयुक्त (१) यांनी असे सांगितले की, सदर कामासाठी टाटा रियलटीमार्फत सुसाध्यता अहवाल तयार करण्याचे काम चालू आहे. ते पूर्ण झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

३.१५ मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी वाशी-घाटकोपर व ठाणे-बोरीवली (संजय गांधी राष्ट्रीय उद्यान) रोपवेबाबत विचारणा करुन लवकरात लवकर अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

३.१६ मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी असे निर्देश दिले की, या बैठकीच्या कार्यवृत्ताच्या मान्यतेची वाट न बघता मंत्रीमंडळाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव लवकरात लवकर सादर करावा.

३.१७ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. १३७५ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम १२ चे उप-कलम (१) चे पोट-कलम (क), (ड), (ई) व (ग) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याव्दारे, मेट्रो मार्ग -४ वडाळा-घाटकोपर-मुलुंड-ठाणे-कासारवडवली या मार्गाचे (लांबी ३२.३२ कि.मी.) महत्व लक्षात घेता प्राधिकरण या प्रकल्पाच्या खालील बाबींना मान्यता देत आहे :-

१. दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित यांनी सादर केलेल्या ३२.३२ कि.मी. लांबीच्या, ३२ स्थानके असलेल्या उन्नत मेट्रो मार्ग-४ या प्रकल्पाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास मान्यता देण्यात येत आहे व राज्य शासनाच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात येत आहे.

२. दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित यांनी अंदाजित केलेल्या मेट्रो मार्ग-४ करीता रु.१४,५४९ कोटी [सन २०१६च्या भावपातळीनुसार (सर्व कर, दरवाढ, जमीन आणि बांधकाम दरम्यानचे व्याज रु.४७ कोटी) इ.सह] प्रकल्प पूर्णत्व किंमतीच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच, राज्य शासनाच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात येत आहे.

३. सदर प्रकल्प मेट्रो कायदा, २००९ (सुधारित) अंतर्गत राबविण्यास तसेच प्रकल्पाची अंमलबजावणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यास मान्यता देण्यात येत आहे व राज्य शासनाच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात येत आहे.

४. सदर प्रकल्प अंमलबजावणी दरम्यान मार्गिकांमध्ये (Alignment) तसेच स्थानकांमध्ये गरज भासल्यास किरकोळ बदल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५. सदर प्रकल्प अंमलबजावणीकरीता प्राधिकरणाकडील स्वत:चा निधी व जागतिक बँक/ एशियन विकास बँक/ जपान आंतरराष्ट्रीय सहकार्य संस्था इ. आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थेमार्फत कर्ज सहाय्य घेण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे, तसेच राज्य शासनास शिफारस करण्यात येत आहे.

६. सदर प्रकल्पासाठी व्दिपक्षीय/ बहुपक्षीय/ आंतरराष्ट्रीय/ आंतरदेशीय अशा विविध वित्तीय संस्थांकडून कर्ज घेण्यासाठी केंद्र सरकार आणि आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था यांच्याबरोबर समन्वय साधणे आणि प्रकल्प अंमलबजावणीच्या पुढील सर्व कार्यवाहीकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला प्राधिकृत करण्यास राज्य शासनास शिफारस करण्यात येत आहे.

७. या प्रकल्पाकरीता केंद्र शासनाकडून निधी मिळविण्याकरीता राज्य शासनामार्फत पाठपुरावा करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

८. तथापि, केंद्र शासनाच्या निधी उपलब्धतेची वाट न पाहता प्राधिकरणाचा निधी वापरुन मेट्रो प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

९. सदर प्रकल्प जुलै, २०२१ पर्यंत पूर्ण करावयाचे उद्दिष्ट असल्याने, प्रकल्पाचे स्थापत्य बांधकाम सुरुवातीला प्राधिकरणाचा निधी वापरुन पूर्ण करण्यासाठी लागणा-या रु.५,०४७ कोटी खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

१०. नागपूर मेट्रो आणि मुंबई मेट्रो मार्ग-३ प्रमाणे मेट्रो मार्ग ४ -वडाळा-घाटकोपर-मुलुंड-ठाणे-कासारवडवली या प्रकल्पासाठी बिनव्याजी दुय्यम कर्जाच्या प्रस्तावास मान्यता देण्यास राज्य

शासनास शिफारस करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

११. सदर प्रकल्पाकरीता बृहपक्षीय/ व्दिपक्षीय आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थाकडून थेट कर्ज घेण्यास प्राधिकरणास प्राधिकृत करण्यास राज्य शासनास शिफारस करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१२. मुंबई मेट्रो मार्ग - ७, २अ, २ब च्या धर्तीवर मेट्रो मार्ग-४ करीता खालीलप्रमाणे समर्पित नागरी परिवहन निधी उभारण्याकरीता शिफारस करण्यात येत आहे :-

अ. मेट्रो मार्गिकांच्या दोन्ही बाजूस ५०० मी. अंतरापर्यंत येणाऱ्या जमिनीवर, अधिमूल्य आकारुन अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक (एफ.एस.आय.) देण्याची तरतूद विकास नियंत्रण नियमावलीत करुन त्यानुसार अधिमूल्याची रक्कम संबंधित क्षेत्रातील नियोजन प्राधिकरणाने वसूल करणे व अशा वाढीव चटईक्षेत्र निर्देशांकापोटी वसूल केलेल्या अधिमूल्याच्या रक्कमेपैकी ५०% रक्कम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे वर्ग करणे.

ब. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६च्या तरतूदीनुसार आकारण्यात येणारे विकास शुल्क शासन अधिसूचित करेल असे महत्वपूर्ण नागरी वाहतूक प्रकल्प राबविण्यात येणाऱ्या शहरात १००% पर्यंत वाढ करुन आकारण्याविषयी कायद्यात तरतूद करणे व त्यानुसार वसूल होणारी वाढीव रक्कम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे वर्ग करणे.

क. शासनाने बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात महत्वपूर्ण नागरी वाहतूक प्रकल्प राबविण्याचे अधिसूचित केल्यास, महानगरपालिका क्षेत्रात मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ अन्वये स्थावर मालमत्तेचे अनुक्रमे विक्री, देणगी व फलपभोग गहाण यावरील संलेखावर बसवायच्या मुद्रांक शुल्कासोबतच जमीन व इतर स्थावर मालमत्तेचे विक्री किंवा देणगीच्याबाबतीत अशारितीने स्थित असलेल्या मालमत्तेच्या मूल्यांवर व फलोपभोग गहाणाच्या संलेखाच्याबाबतीत संलेखात मांडण्यात आलेल्या संलेखाव्दारे सुरक्षित रक्कमेवर १% अधिभार लावण्याची तरतूद मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ मध्ये करुन अशा प्रत्यक्ष जमीन व इतर स्थावर मालमत्तेचे अनुक्रमे विक्री, देणगी व फलोपभोग गहाण संलेखाच्या नोंदणीच्या वेळी सदर अधिभाराची रक्कम संबंधित जिल्हा उपनिबंधकांनी / दुय्यम निबंधकांनी वसूल करणे व शासनाने या

माध्यमातून वसूल झालेल्या रक्कमेएवढे अनुदान दरवर्षी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास वर्ग करणे.

ड. मेट्रो कार डेपो जागेचे वाणिज्यिक विकसनाव्दारे प्राप्त होणारे उत्पन्न प्रस्तुत प्रकल्पासाठी वापरणे.

इ. मेट्रो रेल्वे स्थानकांवरील जाहिरात व पार्किंगपासून मिळणारे उत्पन्न या प्रकल्पासाठी वापरणे इ.

१३. सदर मेट्रो प्रकल्पाकरीता दुरुस्ती व देखभाल आगारासाठी ओवाळे येथील २० हेक्टर जमीन व विक्रोळी येथील १५.५ हेक्टर जमीन उपलब्धतेनुसार किंवा आवश्यकतेप्रमाणे इतर जागा वापरास मान्यता देण्यात येत आहे. तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६च्या कायद्यानुसार आवश्यक ते बदल करण्यास राज्य शासनाकडे शिफारस करण्यात येत आहे.

१४. अतिरिक्त जमीन उपलब्धतेनुसार प्रकल्पासाठी निधी उभारण्याच्या दृष्टीने रहिवाशी/ वाणिज्यिक विकास करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे नाममात्र दराने हस्तांतरित करण्यास राज्य शासनास शिफारस करण्यात येत आहे. तसेच कार डेपोकरीता आवश्यक असलेल्या खाजगी जमिनी मेट्रो रेल्वे अधिनियम, २००९/ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४/महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६/ नविन केंद्रीय भूसंपादन व पुनर्वसन व पुनर्वसाहत अधिनियम, २०१३ अंतर्गत संपादन करण्यास मान्यता देण्यात येत आहे व राज्य शासनाकडे शिफारस करण्यात येत आहे.

१५. मेट्रो मार्ग - ४ खालील तक्यात नमूद केल्याप्रमाणे प्रस्तावित सुरुवातीच्या प्रवासी भाडेदरास मान्यता देण्यात येत आहे तसेच उल्लेखित केलेले भाडे मेट्रो सुरु करण्यापूर्वी वित्तीय व्यवहार्यता तपासून गरज भासल्यास त्यामध्ये आवश्यक बदल करण्याचे अधिकार वापरण्यास प्राधिकरणास प्राधिकृत करण्याबाबत राज्य शासनाकडे शिफारस करण्यात येत आहे :-

| ***अंतर (कि.मी.)*** | ०-३ | ३-१२ | १२-१८ | १८-२४ | २४-३० | ३०-३६ | ३६-४२ | >४२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ***भाडे (रु.)*** | १० | २० | ३० | ४० | ५० | ६० | ७० | ८० |

१६. शासकीय / निमशासकीय /स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या सदर प्रकल्पासाठी कायमस्वरुपी आवश्यक असलेल्या जमिनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे नाममात्र दराने भाडेतत्वावर हस्तांतरीत करण्याकरीता राज्य शासनास शिफारस करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१७. सदर मेट्रो मार्गालगतच्या शासकीय व निमशासकीय संस्थांच्या मोकळया जागांचा मेट्रो रेल्वे बांधकाम कालावधी दरम्यान तात्पुरता वापर करण्यासाठी तसेच संबंधित विभागांनी सदर मोकळया जागा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला सुपूर्द करण्याबाबत संबंधित विभागांस निर्देश देण्याकरीता राज्य शासनास शिफारस करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१८. मेट्रो रेल्वे स्थानक व कार डेपोच्या व्यावसायिक वापरास परवानगी देणे व त्यानुसार सदर जमिनीचा वाणिज्यिक विकास करण्याचे अधिकार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला देण्यास राज्य शासनास शिफारस करण्यात येत आहे.

१९. सदर प्रकल्पांर्गतच्या प्रकल्पबाधितांचे **(PAP)** पुनर्वसन व पुनर्वसाहत आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थेची सहमती घेऊन **"मुंबई नागरी परिवहन प्रकल्प पुनर्वसन व पुनर्वसाहत धोरण (MUTP -R & R Policy)"** नुसार करण्याकरीता मान्यता देण्यात येत आहे.

२०. सदर प्रकल्पाकरीता **मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास "विशेष नियोजन प्राधिकरण"** म्हणून नियुक्त करण्यास शिफारस करण्यात येत आहे.

२१. मेट्रो मार्ग ४ - वडाळा-घाटकोपर-मुलुंड-ठाणे-कासारवडवली हा मेट्रो प्रकल्प **"निकडीचा सार्वजनिक प्रकल्प"** व **"महत्वपूर्ण नागरी वाहतूक प्रकल्प"** म्हणून घोषित करण्यास राज्य शासनास शिफारस करण्यात येत आहे.

२२. शासकीय / खाजगी संस्थांना मेट्रो प्रकल्प हा इतर प्रकल्पांपेक्षा महत्वाचा असेल असे निर्देश देण्यास प्राधिकरणाला प्राधिकृत करण्यास राज्य शासनास शिफारस करण्यात येत आहे.

२३. दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित आणि मुंबई उपनगरीय रेल्वेकरीता सवलतीच्या दरात वीज उपलब्ध होत असून त्याच धर्तीवर महाराष्ट्र विद्युत नियामक मंडळाकडून मेट्रो प्रकल्पांकरीता सवलतीच्या दरात ना नफा ना तोटा या तत्वावर वीज उपलब्ध करुन घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२४. प्रस्तावित मेट्रो मार्गिकेमध्ये काही बस डेपो / स्थानके हे बेस्टच्या मालकी हक्काचे असून, याकरीता मेट्रोचे बेस्ट सेवेशी एकात्मीकरण आणि बस डेपोचे वाणिज्यिक विकास करणे शक्य आहे. सदरच्या प्रस्तावास बेस्ट प्रशासनाने यापूर्वीच मान्यता दिली असून निधी उभारणे

आणि विभागणी याबाबतची यंत्रणा तयार केली जाऊ शकते. याबाबत तत्वतः मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** सदर बैठकीच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीची वाट न पहाता वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** मंत्रिमंडळाची मान्यता मिळेपर्यंत दरम्यानच्या काळात मेट्रो मार्ग-२ ब आणि मेट्रो मार्ग-४ या दोन्ही प्रकल्पाच्या स्थापत्य बांधकामासाठी निविदा प्रक्रिया सुरु करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.४: मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या सुधारीत अंदाजित किंमतीस व सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरीता प्रकल्प अंमलबजावणी घटकाच्या (Project Implementation Unit-PIU) स्थापनेस प्रशासकीय मान्यता देण्याबाबत**

४.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे नमूद केले की, मुंबई पारबंदर प्रकल्पाची अंमलबजावणी शासनाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे सोपविल्यानंतर प्राधिकरणाने प्रकल्पाची अंमलबजावणी सार्वजनिक-खाजगी सहभाग तत्वावर (PPP-DBFOT डिझाईन-बिल्ड- फायनान्स-ऑपरेट-ट्रान्सफर) करण्याकरीता सन २०१३ मध्ये निविदा मागविल्या होत्या. मे.अरुप कन्सलटिंग इंजिनिअरीग सर्व्हिसेस (इं.) प्रा. लि.- केपीएमजी (जेव्ही) या सल्लागाराने प्रकल्पाची अंदाजित किंमत रु.९६३० कोटी (एप्रिल २०१२) अशी निश्चित केली होती . या किंमतीमध्ये प्रकल्पाची मुळ बांधकाम किंमत (Base Construction Cost) रु.७७०४ कोटी इतकी होती. प्रकल्पाच्या अंदाजित किंमतीत बांधकाम कालावधीतील व्याजाकरीता (Interest during construction) तसेच प्रकल्पाकरीता निधी उभारणीकरीता (cost of financing) मिळून २५% रक्कमेची तरतूद करण्यात आली होती. या किंमतीमध्ये भूसंपादनाच्या खर्चाचा अंतर्भाव नव्हता. प्रकल्पाच्या रु.९६३० कोटी या अंदाजित किंमतीला प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीने १३१ व्या बैठकीत मान्यता दिली होती तथापि सदर निविदा प्रक्रियेला प्रतिसाद प्राप्त झाला नाही. तद्नंतर, मुंबई पारबंदर प्रकल्पाची अंमलबजावणी कंत्राटदाराकडून निविदा बोलावून डिझायन बिल्ड पध्दतीने करण्याचे शासनाने ठरविले. त्यादृष्टीने जायका (JICA-Japan International Co-operation Agency) या जपानी शासन पुरस्कृत संस्थेकडून कर्ज प्राप्त करुन प्रकल्प राबविण्याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाच्या शिफारशीसह केंद्र शासनास पाठविण्यात आला. सदर प्रस्तावास केंद्र शासनाच्या वित्त विभागाने मान्यता दिली आहे.

४.२ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही नमूद केले की, जायकाने या प्रकल्पाच्या सर्वेक्षणाकरीता सल्लागार नियुक्त करुन सदर प्रकल्पाकरीता कर्ज देण्याबाबत व्यवहार्यता तपासण्याकरीता प्रकल्पाचा अभ्यास केला. यामध्ये तांत्रिक बाबींसोबतच प्रकल्पाचा पर्यावरणावर व सामाजिक जीवनावर होणा-या परिणामांचा अभ्यास करण्यात आला. या अभ्यासाअंती जायकाच्या सल्लागारांकडून प्रकल्पाचे अंदाजपत्रक बनविण्यात आले असुन प्रकल्पाची एकुण अंदाजित किंमत रु.१७८४३ कोटी इतकी आहे. यामध्ये बांधकामाची किंमत (सन २०१५) आणि भाववाढ (रु.१३३८५ कोटी), भूसंपादन (९९६ कोटी) प्रकल्पाच्या अनुषंगाने उद्‌भवणा-या आकस्मिक बाबींवरील खर्च जसे की, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा (Environment Management Plan) इ. (रु.१३४० कोटी) आणि लवाद, सल्लागार सेवा, प्रशासकीय खर्च, व्हॅट, आयातीवरील कर बांधकाम कालावधीतील व्याज, अग्रीम फी इ. बाबींवरील एकूण खर्च रु.२१२२ कोटी यांचा समावेश आहे.

४.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असे नमुद केले की, हा प्रकल्प यापूर्वी सहा मार्गिकांचा (३+३) नियोजित करण्यात आला होता. जायकाच्या सल्लागाराने जपानी तसेच अन्य आंतरराष्ट्रीय मानकांत सुचविल्याप्रमाणे अपघातासारख्या आपत्कालीन बाबींचा व सुरक्षिततेच्या दृष्टिने विचार करता ६ मार्गिकांच्या दोन्ही बाजूस प्रत्येकी २.५ मी. रुंदीची बाजू पट्टी (Shoulder) असावी अशी शिफारस केली. त्यामुळे पुलाची एकूण रुंदी ६ मीटरने वाढली आहे. प्रकल्पाच्या बांधकाम किंमतीत पुलाच्या वाढीव रुंदीमुळे सुमारे २४.१% वाढ झाली आहे, त्याचप्रमाणे प्रकल्पाचे बांधकाम जलद गतीने होण्याच्या दृष्टीने पुलांच्या मोठया गाळयाकरीता (obligatory spans) जायकाच्या सल्लागाराने पोलादाचे सुपरस्ट्रक्चर वापरण्याचे प्रस्तावित केले आहे. पोलादाचे सुपरस्ट्रक्चरच्या वापरामुळे प्रकल्पाच्या बांधकाम किंमतीत सुमारे १३.३% वाढ झाली आहे परंतु त्यामुळे पुलाच्या कामासाठी लागणा-या एकूण वेळेत किमान एक वर्षाची बचत होईल. जायकाच्या सल्लागाराने प्रकल्पाकरीता सुचविलेल्या अन्य बाबी जसे की, Fenders, Temporary Jetty, Utility Relocation, Geological Investigations & Tests, Toll Gate, ITS, Lightings, Bearings, Expansion Joints, Safety Nets, View Barriers इ. मुळे प्रकल्पाच्या बांधकाम किंमतीत सुमारे ८.१% वाढ झालेली आहे.

४.४ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरीता कंत्राटदारांच्या पूर्वअर्हतेकरीता निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आली असून प्रकल्पाकरीता सल्लागार नेमण्याकरीता देखील निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. प्रकल्पाकरीता निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आल्याने प्रकल्पाची अंमलबजावणी वेळेत पूर्ण करण्याच्या दृष्टीने

मनुष्यबळाची गरज भासणार आहे प्रकल्पाच्या भूसंपादन विषयक बाबी हाताळणे, प्रकल्पग्रस्तांचे पुर्नवसन व पुर्नवसाहत करणे, कंत्राटदारांची नियुक्ती करणे, प्रकल्पांच्या कामावर सर्वसाधारण देखरेख करणे, देयके तपासुन सादर करणे, कायदेशीर बाबी हाताळणे, लेखापरिक्षण करणे, राज्य व केंद्र शासन व इतर संबंधित संस्थांबरोबर समन्वय साधणे, सुरक्षा व्यवस्था, पथकर विषयक बाबी, विविध राज्य व केंद्रीय स्तरावर लागणाऱ्या अंतिम स्तरापर्यंत कायदेशीर परवानग्या घेणे इत्यादी कामांची व्याप्ती पाहता सद्यःपरिस्थिती प्रकल्पाकरीता उपलब्ध असणारे मनुष्यबळ पुरेसे नाही. प्रकल्पाची अंमलबजावणी ठरलेल्या वेळेत पूर्ण करण्याकरीता प्रकल्प अंमलबजावणी घटकाची (Project Implementation Unit) स्थापना करावी अशी शिफारस जायकाच्या शिष्टमंडळाने त्यांच्या अहवालात केली आहे. या अनुषंगाने प्रकल्पाकरीता अभियंत्याची २७ पदे, वित्त व लेखा विभागाकरीता ४ पदे, सामाजिक विकास कक्षाची २ पदे, भूसंपादन कक्षाची ३ पदे, प्रशासन, विधी, पर्यावरण याकरीता ४ पदे व इतर कर्मचारी वर्गातील (टंकलेखक, शिपाई इ.) एकुण १७ अशी एकंदरीत ५७ इतक्या मनुष्यबळाची आवश्यकता प्रकल्पाकरीता भासणार असल्याचे महानगर आयुक्तांनी सांगितले. प्रकल्प अंमलबजावणी घटकाकरीता वर नमुद केलेली पदे गरजेनुसार टप्प्याटप्प्याने भरण्यात येतील. सदर प्रकल्प अंमलबजावणीच्या घटकाच्या स्थापनेतील मनुष्यबळाची नियुक्ती सरळसेवा / प्रतिनियुक्ती/ पदोन्नती/ कंत्राटी तत्वावर करण्यात येईल.

४.५ प्राधिकरणाचे सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे, विधान परिषद सदस्य यांनी असे नमूद केले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने शिवडी ते वरळी प्रकल्प त्याचप्रमाणे रेवस ते कारंजा पूल या प्रकल्पांची कामे प्राधान्याने हाती घ्यावीत. मुंबई पारबंदर प्रकल्प व हे दोन प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मुंबई ते अलिबाग व रायगड जिल्हयाशी वाहतूक दळणवळण वेगवान होईल असे त्यांनी नमूद केले.

४.६ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणात प्रतिनियुक्तीवर असलेले सार्वजनिक बांधकाम विभागाचे श्री.साखळकर, कार्यकारी अभियंता व श्री. देशपांडे, उप-अभियंता हे दोन अधिकारी मुंबई पारबंदर प्रकल्पावर कार्यरत असून प्राधिकरणात त्यांच्या चार वर्षापेक्षा जास्त सेवा झाल्याने श्री.देशपांडे, उप-अभियंता यांची सार्वजनिक बांधकाम विभागात बदली करण्यात आलेली आहे. मुंबई पारबंदर प्रकल्प सध्या अत्यंत महत्वाच्या टप्प्यावर असून या अधिकाऱ्यांचे प्रकल्पास महत्वाचे योगदान आहे. मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या आवश्यकतेनुसार त्यांच्या सेवा दीर्घ कालावधीकरीता प्राधिकरणास उपलब्ध करुन द्याव्यात अशी विनंती महानगर आयुक्त यांनी मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांना केली. त्यास मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी सहमती दर्शविली.

४.७ महानगर आयुक्त यांनी या प्रकल्पाकरीता मेट्रो प्रकल्पाप्रमाणे लागणाऱ्या पुनर्वसनाकरीता MUTP चे पुनर्वसन धोरण लागू करण्याचे प्रस्तावित केले ज्यास संमती दर्शविण्यात आली.

४.८ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. १३७६ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम १२ चे उप-कलम (१) चे (क), (ड), (ई) व (ग) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरणाव्दारे मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या जायकाने प्रस्तावित केलेल्या रु. १७,८४३ कोटी इतक्या सुधारित किंमतीला प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. या प्रकल्पात लागणाऱ्या पुनर्वसनाकरीता MUTP चे पुनर्वसन धोरण लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी प्रकल्प अंमलबजावणी घटकाच्या (Project Implementation Unit) स्थापनेस प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. प्रकल्प अंमलबजावणी घटकाची स्थापना करण्याकरीता आवश्यक ते मनुष्यबळाच्या आस्थापनेसाठी येणारा एकूण व्यवस्थापकीय खर्च हा प्रकल्पाच्या एकूण खर्चाच्या २% खर्चापेक्षा जास्त नसावा, या अटींच्या अधीन राहून खालील पदांच्या निर्मितीस मान्यता देण्यात येत आहे. सदर पदे सरळसेवा / प्रतिनियुक्ती / पदोन्नती / कंत्राटी तत्वावर भरण्याकरीता महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहेत:-

**विभागनिहाय पदे व वेतनश्रेणी**

| अ.क्र. | विभागाचे नाव | पद | संख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| १ | **अभियांत्रिकी विभाग** | मुख्य अभियंता (स्थापत्य) | १ | (पीबी-IV रु.३७४००-६७,००० ग्रेड पे-८९००) |
| | | अधिक्षक अभियंता (स्थापत्य) | २ | (पीबी-III रु.१५,६००-३९,१०० ग्रेड पे-७६००) |
| | | कार्यकारी अभियंता (स्थापत्य) | ६ | (पीबी-III रु.१५,६००-३९,१०० ग्रेड पे-६६००) |
| | | कार्यकारी अभियंता (विद्युत) | २ | (पीबी-III रु.१५,६००-३९,१०० ग्रेड पे-६६००) |
| | | उप अभियंता श्रेणी १ (स्थापत्य) | ६ | (पीबी-III रु.१५,६००-३९,१०० ग्रेड पे-५४००) |
| | | उप अभियंता श्रेणी १ (विद्युत) | २ | (पीबी-III रु.१५,६००-३९,१०० ग्रेड पे-५४००) |
| | | उप अभियंता श्रेणी २ (स्थापत्य) | ६ | (पीबी-II रु.९,३००-३४,८०० ग्रेड पे-४४००) |
| | | उप अभियंता श्रेणी २ (विद्युत) | २ | (पीबी-II रु.९,३००-३४,८०० ग्रेड पे-४४००) |
| | **एकूण नवीन निर्माण केलेली पदे** | | **२७** | |

| अ.क्र. | विभागाचे नाव | पद | संख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| २ | **वित्त व लेखा विभाग** | उप मुख्य लेखा अधिकारी, एमटीएचएल | १ | (पीबी-III रु.१५,६००-३९,१०० ग्रेड पे-७६००) |
| | | सहा मुख्य लेखा अधिकारी, एमटीएचएल | १ | (पीबी-III रु.१५,६००-३९,१०० ग्रेड पे-६६००) |
| | | लेखा अधिकारी, एमटीएचएल | २ | (पीबी-II रु.९,३००-३४,८०० ग्रेड पे-४६००) |
| | **एकूण नवीन निर्माण केलेली पदे** | | **४** | |
| ३ | **सामाजिक विकास कक्ष** | उप जिल्हाधिकारी | १ | (पीबी-III रु.१५,६००-३९,१०० ग्रेड पे-५४००) |
| | | तहसिलदार | १ | (पीबी-III रु.१५,६००-३९,१०० ग्रेड पे-५०००) |
| | **एकूण नवीन निर्माण केलेली पदे** | | **२** | |
| ४ | **भूसंपादन कक्ष** | सहाय्यक भूमी व मिळकत व्यवस्थापक | १ | (पीबी-II रु.९,३००-३४,८०० ग्रेड पे-४६००) |
| | | भूमापक | २ | (पीबी-I रु.५,२००-२०,२०० ग्रेड पे-२४००) |
| | **एकूण नवीन निर्माण केलेली पदे** | | **३** | |
| ५ | **प्रशासन, विधी, पर्यावरण इ.** | प्रशासकीय अधिकारी | १ | (पीबी-III रु.१५,६००-३९,१०० ग्रेड पे-५४००) |
| | | कर्मचारी वर्ग अधिकारी | १ | (पीबी-III रु.१५,६००-३९,१०० ग्रेड पे-५०००) |
| | | विधी अधिकारी | १ | (पीबी-III रु.१५,६००-३९,१०० ग्रेड पे-६६००) |
| | | पर्यावरण अधिकारी | १ | (पीबी-III रु.१५,६००-३९,१०० ग्रेड पे-६६००) |
| | **एकूण नवीन निर्माण केलेली पदे** | | **४** | |
| ६ | **इतर कर्मचारी वर्ग** | लघु-टंकलेखक | ३ | (पीबी-I रु.५,२००-२०,२०० ग्रेड पे-२४००) |
| | | सहाय्यक | ५ | (पीबी-II रु.९,३००-३४,८०० ग्रेड पे-४३००) |
| | | संगणक चालक-नि-लिपिक | ५ | (पीबी-I रु.५,२००-२०,२०० ग्रेड पे-१९००) |
| | | शिपाई | ४ | (पीबी-I रु.४४४०-७४४० ग्रेड पे-१३००) |
| | **एकूण नवीन निर्माण केलेली पदे** | | **१७** | |
| | **एकूण नवीन पदनिर्मिती** | | **५७** | |

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**पटल बाब क्र.१: प्राधिकरणाने झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत प्राप्त झालेल्या हस्तांतरणीय विकास हक्काची खुल्या बाजारात विक्री करणेबाबत.**

१. या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत प्रकल्पामध्ये बाधित झालेल्या लोकांसाठी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत विकास नियमावली क्र.३३ (१०) चे कलम ३.११ व कलम ३.५ आणि ३.१९ सहपत्र-४ अन्वये बांधण्यात आलेल्या सदनिकांकरीता सदरच्या योजनेअंतर्गत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास बृहन्मुंबई महानगरपालिकेने मंजूर केलेल्या १,०२,१३७.८० चौ.मी. हस्तांतरणीय विकास हक्कापैंकी प्राधिकरणाच्या मागील १३९व्या बैठकीत ठराव क्र.१३६४ अन्वये मान्यता दिल्यानुसार त्यापैकी १५,३१४.७५ चौ.मी. इतका हस्तांतरणीय विकास हक्क विक्री करण्यात आला आहे. तसेच सदरच्या प्राधिकरणाच्या बैठकीत मान्यता दिल्यानुसार उर्वरित सर्व ८६८२३.१२ चौ.मी. हस्तांतरणीय विकास हक्क विक्रीसाठी, हस्तांतरणीय विकास हक्काचे आकारमानाची किमान मर्यादा न ठेवता व यापूर्वीच्या निविदा पत्रकातील अटी व शर्तीवर ई-निविदा मागविण्यासाठी दिनांक ०६ एप्रिल, २०१६ रोजीच्या वृत्तपत्रामध्ये निविदा सुचना प्रकाशित करण्यात आला होती. त्यास अनुसरुन अंतिम दिनांक २६ एप्रिल, २०१६ पर्यंत खालीलप्रमाणे ई-निविदा प्राप्त झाल्या होत्या :-

**(१) डी.आर.सी.क्र.एस.आर.ए./६७२/कंन्स्ट्र. : ७४७०.४९ चौ.मी. (ई-निविदा क्र.४७४)**

| अ.क्र. | बोलीदाराचे नाव | मागणी केलेला हस्तांतरणीय विकास हक्क (चौ.मी.) | निविदीत दर (रु.) | श्रेणी |
|---|---|---|---|---|
| **निविदा प्राप्त झालेल्या नाहीत** | | | | |

**(२) डी.आर.सी.क्र.एस.आर.ए./६७८/कंन्स्ट्र. : ३६१६०.२६ चौ.मी. (ई-निविदा क्र.४७५)**

| अ.क्र. | बोलीदाराचे नाव | मागणी केलेला हस्तांतरणीय विकास हक्क (चौ.मी.) | निविदीत दर (रु.) | श्रेणी |
|---|---|---|---|---|
| १. | मे. शिव रियल्टी प्रा.लि. | ३००.०० | ३७,०००/- | उच्च-१ |
| २. | मे. स्टील प्लॅान्ट प्रा.लि. | २०००.०० | ३६,५११/- | उच्च-२ |
| ३. | मे. कोलते पाटील डेव्हलपर्स लि. | ४४२७.०० | ३६,४२५/- | उच्च-३ |
| ४. | मे. स्ट्रीमलाईन फायनान्स ॲण्ड ईन्व्हेस्टमेंट प्रा.लि. | २०००.०० | ३६,४२१/- | उच्च-४ |
| | **एकूण** | **८४२७.०** | | |

**(३) डी.आर.सी.क्र.एस.आर.ए./६८५/कंन्स्ट्र. : ७२१४.७६ चौ.मी. (ई-निविदा क्र.४७६)**

| अ.क्र. | बोलीदाराचे नाव | मागणी केलेला हस्तांतरणीय विकास हक्क (चौ.मी.) | निविदीत दर (रु.) | श्रेणी |
|---|---|---|---|---|
| **निविदा प्राप्त झालेल्या नाहीत** | | | | |

**(४) डी.आर.सी.क्र.एस.आर.ए./६९९/कंन्स्ट्र. : ३३५२४.२८ चौ.मी. (ई-निविदा क्र.४७७)**

| अ.क्र. | बोलीदाराचे नाव | मागणी केलेला हस्तांतरणीय विकास हक्क (चौ.मी.) | निविदीत दर (रु.) | श्रेणी |
|---|---|---|---|---|
| १. | मे. वालजी सेजपाल ॲण्ड कंपनी | १२५०.०० | ३७,१९१/- | उच्च-१ |
| २. | मे. ईन्टीग्रेटेड स्पेस लि. | २२००.०० | ३६,५९४/- | उच्च-२ |
| ३. | मे. मेफेयर हाऊसिंग प्रा.लि. | ७८०.०० | ३६,४००/- | उच्च-३ |
| | **एकूण** | **४२३०.००** | | |

**(५) डी.आर.सी.क्र.एस.आर.ए./७०९/कंन्स्ट्र. : २४५३.३३ चौ.मी. (ई-निविदा क्र.४७८)**

| अ.क्र. | बोलीदाराचे नाव | मागणी केलेला हस्तांतरणीय विकास हक्क (चौ.मी.) | निविदीत दर (रु.) | श्रेणी |
|---|---|---|---|---|
| १. | मे. कुणाल रियल्टर्स | ६००.०० | ३९,००१/- | उच्च-१ |
| २. | मे. भूमी कंन्स्ट्रवेल प्रा.लि. | २४५३.३३ | ३८,८४७/- | उच्च-२ |
| | **एकूण** | **३०५३.३३** | | |

२. उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या निविदांची छाननी केली असता निविदापत्रकातील सर्व अटी व शर्तींची पूर्तता सर्व निविदाकार करीत असल्याचे दिसून आले.

३. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमीन विल्हेवाट) विनियम, १९७७ अन्वये जमीन विक्री बाबतचे अधिकार प्राधिकरणास आहेत. प्राधिकरणास प्राप्त झालेल्या हस्तांतरणीय विकास हक्क ही बाब स्थावर मालमत्तेच्या संदर्भात असल्याने हस्तांतरणीय विकास हक्क विक्रीसाठी प्राधिकरणाच्या मंजूरीची आवश्यकता आहे. तथापि, मालमत्ता संदर्भातील खुल्या बाजारातील दराची होत असलेले चढ-उतार, तसेच या प्रकरणी असलेला पूर्वानुभव व प्राधिकरणाकडे उपलब्ध असलेला हस्तांतरणीय विकास हक्काचा वैधता कालावधी (सन २०१७) विचारात घेता, सदरच्या प्रक्रियेस दिर्घकाळ न लावता तातडीने निर्णय घेऊन कार्यवाही करणे आवश्यक होती. सबब, सदरच्या प्रक्रियेस प्राधिकरणाची मान्यता प्राप्त

करण्यासापेक्ष, मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांची या प्रकरणी मान्यता घेऊन प्रस्तुत निविदा प्रक्रियेमध्ये प्राप्त झालेल्या दरानुसार व निविदापत्रकातील अटी व शर्तीनुसार पुढीलप्रमाणे हस्तांतरणीय विकास हक्क खरेदीचा देकार संबंधितांना देण्यात आला :-

**(१) डी.आर.सी.क्र.एस.आर.ए./६७८/कंन्स्ट्र. : ३६१६०.२६ चौ.मी. (ई-निविदा क्र.४७५)**

| अ.क्र. | बोलीदाराचे नाव | मागणी केलेला हस्तांतरणीय विकास हक्क (चौ.मी.) | निविदीत दर (रु.) | वितरीत करावयाचा हस्तांतरणीय विकास हक्क (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|
| १. | मे. शिव रियल्टी प्रा.लि. | ३००.०० | ३७,०००/- | ३००.०० |
| २. | मे. स्टील प्लॉन्ट प्रा.लि. | २०००.०० | ३६,५११/- | २०००.०० |
| ३. | मे. कोलते पाटील डेव्हलपर्स लि. | ४४२७.०० | ३६,४२५/- | ४४२७.०० |
| ४. | मे. स्ट्रीमलाईन फायनान्स ॲण्ड ईन्व्हेस्टमेंट प्रा.लि. | २०००.०० | ३६,४२१/- | २०००.०० |

**(२) डी.आर.सी.क्र.एस.आर.ए./६९९/कंन्स्ट्र. : ३३५२४.२८ चौ.मी. (ई-निविदा क्र.४७७)**

| अ.क्र. | बोलीदाराचे नाव | मागणी केलेला हस्तांतरणीय विकास हक्क (चौ.मी.) | निविदीत दर (रु.) | वितरीत करावयाचा हस्तांतरणीय विकास हक्क (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|
| १. | मे. वालजी सेजपाल ॲण्ड कंपनी | १२५०.०० | ३७,१११/- | १२५०.०० |
| २. | मे. ईन्टीग्रेटेड स्पेस लि. | २२००.०० | ३६,५९४/- | २२००.०० |
| ३. | मे. मेफेयर हाऊसिंग प्रा.लि. | ७८०.०० | ३६,४००/- | ७८०.०० |

**(३) डी.आर.सी.क्र.एस.आर.ए./७०९/कंन्स्ट्र. : २४५३.३३ चौ.मी. (ई-निविदा क्र.४७८)**

| अ.क्र. | बोलीदाराचे नाव | मागणी केलेला हस्तांतरणीय विकास हक्क (चौ.मी.) | निविदीत दर (रु.) | वितरीत करावयाचा हस्तांतरणीय विकास हक्क (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|
| १. | मे. कुणाल रियल्टर्स | ६००.०० | ३९,००१/- | ६००.०० |
| २. | मे. भूमी कंन्स्ट्रवेल प्रा.लि. | २४५३.३३ | ३८,८४७/- | १८५३.३३ |

४. हस्तांतरणीय विकास विक्री करण्याबाबत अद्यापपर्यंत केलेली कार्यवाही विचारात घेता, प्राधिकरणाकडे असलेला एकूण १,०२,१३७ चौ.मी. हस्तांतरणीय विकास हक्कांपैकी ३०,४२५.०८ चौ.मी. विक्री झाला असून प्राधिकरणाकडे अद्याप ७१,७१२.७२ चौ.मी. हस्तांतरणीय विकास हक्क शिल्लक आहे. सदर हस्तांतरणीय विकास हक्काचा वैधता कालावधी २०१७ मध्ये संपत आहे. हस्तांतरणीय विकास हक्काचा वैधता कालावधी संदर्भात प्राधिकरणाचे सदस्य श्री. अजोय मेहता, महापालिका आयुक्त,

बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी बैठकीत असे सांगितले की, हस्तांतरणीय विकास हक्कासाठी निर्धारित केलेली १० वर्षाच्या कालावधीची अट (५ वर्षे व नूतनीकरण करुन अधिक ५ वर्षे) काढून टाकण्याची बाब महापालिकेच्या विचाराधीन आहे.

५. मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी प्रस्तावास मंजूरी दिल्यानुसार उपरोक्त परिच्छेद क्र.३ मध्ये १, २ व ३ मध्ये नमूद केल्यानुसार संबंधित निविदाकारांस हस्तांतरणीय विकास हक्क विक्रीचे देकारपत्र दिनांक १८.०५.२०१६ रोजी देण्यात येऊन, एकूण ९ निविदाकारांपैकी ८ निविदाकारांनी संपूर्णपणे रक्कम भरली असून, एका निविदाकाराने ५०% रक्कमेचा भरणा केलेला आहे. ज्या निविदाकारांनी संपूर्णपणे रक्कम भरली आहे त्यांचेशी विक्री करारनामा (Sale Agreement) इ. करण्याची कार्यवाही करण्यात येऊन पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

६. उरलेल्या विकास हक्क विक्रीची कार्यवाही देखील पुन्हा सुरु करण्याचे निर्देश मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी दिले.

७. त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :

**ठराव क्र. १३७७ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४च्या कलम ३ चे उप-कलम (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याव्दारे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत प्राधिकरणास प्राप्त झालेल्या १,०२,१३७.८० चौ.मी. हस्तांतरणीय विकास हक्कांपैकी उर्वरित ८६,८२३.१२ चौ.मी. हस्तांतरणीय विकास हक्क ई-निविदेव्दारे निविदा मागवून प्राप्त झालेल्या निविदेमधील उच्चतम दराने खालीलप्रमाणे विक्री करण्यास झालेल्या कार्यावाहीस कार्योत्तर मंजूरी देत आहे :-

**(१) डी.आर.सी.क्र.एस.आर.ए./६७८/कंन्स्ट्र. : ३६१६०.२६ चौ.मी. (ई-निविदा क्र.४७५)**

| अ.क्र. | बोलीदाराचे नाव | मागणी केलेला हस्तांतरणीय विकास हक्क (चौ.मी.) | निविदीत दर (रु.) | वितरीत करावयाचा हस्तांतरणीय विकास हक्क (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|
| १. | मे. शिव रियल्टी प्रा.लि. | ३००.०० | ३७,०००/- | ३००.०० |
| २. | मे. स्टील प्लॅान्ट प्रा.लि. | २०००.०० | ३६,५११/- | २०००.०० |
| ३. | मे. कोलते पाटील डेव्हलपर्स लि. | ४४२७.०० | ३६,४२५/- | ४४२७.०० |
| ४. | मे. स्ट्रीमलाईन फायनान्स ॲण्ड ईन्व्हेस्टमेंट प्रा.लि. | २०००.०० | ३६,४२१/- | २०००.०० |

**(२) डी.आर.सी.क्र.एस.आर.ए./६९९/कंन्स्ट्र. : ३३५२४.२८ चौ.मी. (ई-निविदा क्र.४७७)**

| अ.क्र. | बोलीदाराचे नाव | मागणी केलेला हस्तांतरणीय विकास हक्क (चौ.मी.) | निविदीत दर (रु.) | वितरीत करावयाचा हस्तांतरणीय विकास हक्क (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|
| १. | मे. वालजी सेजपाल ॲण्ड कंपनी | १२५०.०० | ३७,१९१/- | १२५०.०० |
| २. | मे. ईन्टीग्रेटेड स्पेस लि. | २२००.०० | ३६,५९४/- | २२००.०० |
| ३. | मे. मेफेयर हाऊसिंग प्रा.लि. | ७८०.०० | ३६,४००/- | ७८०.०० |

**(३) डी.आर.सी.क्र.एस.आर.ए./७०९/कंन्स्ट्र. : २४५३.३३ चौ.मी. (ई-निविदा क्र.४७८)**

| अ.क्र. | बोलीदाराचे नाव | मागणी केलेला हस्तांतरणीय विकास हक्क (चौ.मी.) | निविदीत दर (रु.) | वितरीत करावयाचा हस्तांतरणीय विकास हक्क (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|
| १. | मे. कुणाल रियल्टर्स | ६००.०० | ३९,००१/- | ६००.०० |
| २. | मे. भूमी कंन्स्ट्रवेल प्रा.लि. | २४५३.३३ | ३८,८४७/- | १८५३.३३ |

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** उपरोक्तप्रमाणे हस्तांतरणीय विकास हक्क विक्री नंतर बाकी असलेला ७१,७१२.७२ चौ.मी. हस्तांतरणीय विकास हक्क विक्रीसाठी ई-निविदा काढण्यास व त्यापुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यास प्राधिकरण याव्दारे मंजूरी देत आहे.

**"पुढे असा ठराव करण्यात येत आहे की,** उपरोक्तप्रमाणे निविदाकारांनी अटी व शर्तीनुसार देकार स्विकारुन रक्कमेचा भरणा केल्यानंतर त्यांचेसोबत आर्थिक करार करण्यास तसेच, तद्नंतर उपभोक्ता फॉर्म (यु फॉर्म) निर्गमित करण्यास, तसेच निविदाकार अथवा त्यांनी नामनिर्देशित केलेल्याशी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे सादर करावयाचा करार साक्षांकित करण्यास महानगर आयुक्त यांना हे प्राधिकरण प्राधिकृत करीत आहे."

**पटल बाब क्र.२: प्राधिकरणातील महत्वाकांक्षी प्रकल्पातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना कार्यालयीन वाहने उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने १० नवीन वाहने खरेदी करण्याबाबत.**

१. या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, केंद्र व राज्य शासनाने वाहतूक व दळणवळण व्यवस्था अधिक सुलभ व सोयीस्कर होण्याच्या दृष्टीकोनातून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून मेट्रो रेल प्रकल्प, मोनो रेल प्रकल्प, मुंबई ट्रान्स हार्बर लिंक प्रकल्प, पुर्नवसन व पुर्नवसाहत आणि विविध महत्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यात येत आहेत. या

महत्वाकांक्षी प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी अभियांत्रिकी, परिवहन, महसूल व नगर नियोजन इत्यादी क्षेत्रातील निष्णांत व अनुभवी अधिका-यांच्या नेमणूका करण्यात येत आहेत. त्यापैकी काही अधिकारी रुजू झाले असून काही अधिकारी लवकरच रुजू होणार आहेत. सदर विविध प्रकल्प निर्धारित वेळेत व यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी सदर अनुभवी अधिका-यांना साईट व्हिजिटसाठी कार्यालयीन वाहने उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. सद्यःस्थितीत प्राधिकरणामध्ये पीबी-४ वेतनश्रेणी रु.३६४००-६७००० या वेतनश्रेणीतील अधिका-यांची संख्या विचारात घेता केवळ २८ वाहने असून ती वरिष्ठ अधिका-यांच्या सेवेत आहेत. त्यामुळे नवीन १० वाहने खरेदी करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला.

२. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मेट्रो प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी प्राधिकरणाने नुकतीच नव्याने ४५ पदे निर्माण केलेली आहेत. त्यामध्ये संचालक (मेट्रो), संचालक (नियोजक), मुख्य अभियंता, अधिक्षक अभियंता अशा विविध पदांचा प्रामुख्याने समावेश आहे. सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरीता नव्याने नियुक्त करण्यात येणा-या अधिका-यांना त्यांच्या वेतनश्रेणीनुसार आणि सदर वित्त विभागाच्या दिनांक ८ मे, २०१४ च्या शासन निर्णयानुसार वाहन अनुज्ञेय आहे. सदर मेट्रो प्रकल्प २०१९ पूर्वी वेळेत पूर्ण करण्याच्या दृष्टीने वाहनाकरीता अनुज्ञेय असलेल्या वरिष्ठ अधिका-यांना वाहनाची सुविधा उपलब्ध करणे अत्यावश्यक आहे ही बाब लक्षात घेता, सदर शासन निर्णयातील तरतूदींचा विचार करता सद्यःस्थितीत जी वाहने खरेदी करावयाची आहेत ती कोणतीही जुनी वाहने निर्लेखित न करता खरेदी करावयाची आहेत त्या दृष्टीने प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी सदर प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. तरी, विविध महत्वाकांक्षी प्रकल्पावर रुजू होणा-या अधिका-यांना कार्यालयीन वाहने उपलब्ध करुन द्यावयाची आवश्यकता विचारात घेता, प्राधिकरणास विनंती करण्यात येते की, १० नवीन वाहने खरेदी करण्यास तसेच त्याकरीता येणा-या अंदाजित रु.१ कोटी खर्चास कृपया मान्यता असावी. सदर वाहने शासनाने विहीत केलेल्या मर्यादीत किंमतीनुसार खरेदी करण्यात येतील. तसेच नवीन वाहने खरेदी करण्यासाठी झालेला खर्च सन २०१६-१७ च्या सुधारीत अर्थसंकल्पात अंतर्भूत करण्यात येईल. तसेच नवीन वाहने खरेदी करताना शक्यतो दर कंत्राटातील (DGS&D) वाहने खरेदी करण्यात येतील. परंतु काही वाहने उदा. होंडा सिटी, इन्होवा इ. वाहने दर कंत्राटामध्ये नसतात. अशी वाहने अधिकृत विक्रेत्यांकडून निविदा प्राप्त करुन कमीत कमी रक्कम नमूद करणा-या अधिकृत विक्रेत्याकडून खरेदी करण्यात येतील. त्यादृष्टीने प्राधिकरणास १० वाहने खरेदी करण्यास कृपया मान्यता दयावी.

३. त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. १३७८ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे प्राधिकरणाच्या विविध प्रकल्पातील नेमणूक करण्यात आलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी १० नवीन वाहने खरेदी करण्यास व त्याकरीता रु.१ कोटी इतक्या अंदाजित खर्चास प्राधिकरण याव्दारे मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** यासंबंधी पुढील योग्य ती कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे. "

**पटल बाब क्र.३: वांद्रे-कुर्ला संकुलाच्या विकास नियंत्रण विनियम क्र.४ (i) मध्ये फेरबदल करणेबाबत.**

१. महानगर आयुक्तांनी या विषयाची माहिती देताना असे सांगितले की, शासनाने दिनांक ७ मार्च, १९७७ च्या अधिसूचनेनुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास वांद्रे-कुर्ला संकुल अधिसूचित क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्त केले आहे. वांद्रे-कुर्ला संकुलाच्या १९७९ च्या मंजूर नियोजन प्रस्तावातील विकास नियंत्रण विनियमातील फेरबदलास शासनाने वेळोवेळी मान्यता दिली आहे. वांद्रे-कुर्ला संकुलाच्या १९७९ च्या मान्यताप्राप्त विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम क्र.४(i) मधील तरतूदीनुसार संकुलातील कोणत्याही जमिनीवर मान्यताप्राप्त नियोजन प्रस्तावामध्ये दर्शविलेल्या जमीन वापराव्यतिरिक्त दुसरा कोणताही जमीन वापर अनुज्ञेय नाही.

२. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, शासनाने त्यांच्या दिनांक २ मे, २००८ रोजीच्या अधिसुचनेद्वारे "जी" ब्लॉकसाठी अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक रहिवासी क्षेत्रासाठी ३.०० व वाणिज्य क्षेत्रासाठी ४.०० पर्यंत वाढ करण्यास मंजूरी दिली. त्यानंतर शासनाने त्यांच्या दिनांक २३ ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या अधिसुचनेद्वारे "जी" ब्लॉकसाठी अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक रहिवासी क्षेत्रासाठी ३.०० वरुन ४.०० पर्यंत वाढ करण्यास मंजूरी दिली आहे. त्यामुळे आता वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमध्ये वाणिज्य व रहिवासी वापराकरीता चटई क्षेत्र निर्देशांक समान (म्हणजेच ४.० एवढा) आहे. वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकसाठी अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक रहिवासी क्षेत्रासाठी ३.०० वरुन ४.०० पर्यंत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ अन्वये सोपस्कार करताना प्राधिकरणाने नेमलेल्या नियोजन समितीने काही प्रमाणात मिश्र वापर अनुज्ञेय करण्याबाबत शासनास शिफारस केली होती. आता प्राधिकरणाच्या काही भाडेपट्टेदारांनी देखिल "जी" ब्लॉकमध्ये मिश्र

वापर म्हणजेच वाणिज्य भूखंडावर रहिवासी बांधकाम क्षेत्र तसेच निवासी भूखंडावर वाणिज्य बांधकाम क्षेत्र अनुज्ञेय करण्याबाबत विनंती केली आहे.

३. महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावली, १९९१ मधील नियम क्र.५१ ते ५४ प्रमाणे मिश्र वापर अनुज्ञेय आहे. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रारुप विकास नियंत्रण नियमावली, २०३४ मध्ये देखिल असे मिश्र वापर अनुज्ञेय आहेत. असे मिश्र वापर अनुज्ञेय केल्यास या क्षेत्रात कार्यालयीन वेळेनंतर उत्साहवर्धीत व चैतन्यमय वातावरण निर्माण होण्यास मदत होईल. सबब, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमधील प्राधिकरणाच्या मालकीच्या भूखंडावर मिश्र वापर अनुज्ञेय करावयाचा ठरल्यास, वाणिज्य वापराच्या सर्व भूखंडावरील इमारतीत कमाल बांधकाम क्षेत्राच्या ३०% पर्यंत रहिवासी वापर अनुज्ञेय करता येईल. मात्र रहिवासी वापराच्या सर्व भूखंडावरील इमारतीत तळमजला व पहिला मजल्यापर्यंत वाणिज्य वापर अनुज्ञेय करता येईल. असे मिश्र वापर /मिश्र बांधकाम क्षेत्र अनुज्ञेय करावयाचे झाल्यास संकुलाच्या विकास नियंत्रण विनियम क्र.४(i) मध्ये "जी" ब्लॉकमध्ये अशी तरतूद करावी लागेल. त्यासाठी विनियम क्र.४(i) मध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७(१) अन्वये फेरबदल करावा लागेल.

४. प्राधिकरणाचे सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे, विधान परिषद सदस्य यांनी सध्या वाटप झालेल्या भूखंडांवर असे मिश्र वापर अनुज्ञेय करण्यासाठी एक योजना बनवावी लागेल अशी सूचना केली. याबाबत मा. मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी असे सांगितले की, यापुढील वाटपाच्या भूखंडांसाठी सदर प्रस्ताव मान्य करण्यास व त्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७(१) अनुसार पुढील सोपस्कार करण्यास हरकत नसावी. परंतु त्यापूर्वी, सध्या वाटप झालेल्या भूखंडांवर असे मिश्र वापर अनुज्ञेय करण्यासंदर्भात प्राधिकरणाचे महानगर आयुक्त, आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका व प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांची तीन सदस्यीय समिती नेमून त्यांचा यापूर्वी वाटप झालेल्या भूखंडावर मिश्र वापर अनुज्ञेय करताना अधिमूल्य आकारावे किंवा कसे व इतर काही अटी व शर्तीबाबतचा अहवाल प्राधिकरणाच्या आगामी बैठकीमध्ये सादर करावा असे निर्देश दिले.

**पटल बाब क्र.४: प्राधिकरणातील महत्वाकांक्षी प्रकल्पामध्ये भूसंपादन / पुनर्वसनाच्या कामाकरीता अतिरिक्त पदे निर्माण करण्याबाबत.**

१. या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाने मुंबई महानगर प्रदेशात ११८ कि.मी. लांबीच्या मेट्रो मार्गाची अंमलबजावणी करण्याचे निश्चित केले आहे.

त्याकरीता प्राधिकरणाच्या दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी झालेल्या १३८व्या बैठकीत मेट्रो प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने २५२ पदांचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता आणि त्यापैकी ४५ पदे तातडीने भरण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर ४५ पदांमध्ये भूसंपादन आणि पुर्नवसन व पुर्नवसाहतीच्या कामाकरीता आवश्यक असलेल्या अप्पर जिल्हाधिकारी-२, उप जिल्हाधिकारी-४, आणि तहसिलदार-४ या १० पदांचा समावेश नव्हता. मेट्रो प्रकल्पाच्या अंमलबजावणी अंतर्गत करावयाचे भूसंपादन आणि प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या कुटुंबांचे पुर्नवसन करण्यासाठी अप्पर जिल्हाधिकारी, उप- जिल्हाधिकारी व तहसिलदार या संवर्गातील अनुभवी महसुली अधिका-यांची आवश्यकता भासत आहे. त्या अनुषंगाने १० पदे निर्मितीचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

२. महानगर आयुक्तांनी असेही सांगितले की, उपरोक्त दहाही पदे महसूल क्षेत्राशी संबंधित असल्यामुळे सदर पद निर्मितीस मान्यता दिल्यानंतर महसूल विभागातील योग्य व अनुभवी अधिका-यांची प्रतिनियुक्तीवर नेमणूक करण्याकरीता शासनास विनंती करण्यात येईल. तसेच प्राधिकरणामध्ये अनधिकृत बांधकाम हटविण्याच्या दृष्टीने यापूर्वी नियंत्रक (अनधिकृत बांधकामे), उप नियंत्रक (अनधिकृत बांधकामे), सह नियंत्रक (अनधिकृत बांधकामे), अशी पदे निर्माण करण्यात आलेली आहेत. सदर पदांचा वापरही प्रतिनियुक्तीवर अथवा निवड पध्दतीने करण्याच्या दृष्टीने सदर पदांच्या पदनामात बदल करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

३. प्राधिकरणाच्या अनेक महत्वाकांक्षी प्रकल्पांकरीता भूसंपादन आणि प्रकल्पबाधित कुटुंबांचे पुर्नवसन करण्याच्या दृष्टीने १० नवीन पदे निर्माण करण्यास तसेच ४ पदांच्या पदनामामध्ये बदल करण्यास प्राधिकरणास मान्यता देण्याची विनंती करण्यात आली.

४. त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. १३७९ :**

**“असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ११ चे उपकलम (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याद्वारे बाब टिप्पणीत प्रस्तावित

केल्याप्रमाणे खालील १० पद निर्मितीस व ४ पदांच्या पदनामात बदल करण्यास याव्दारे मान्यता देत आहे:-

**पद निर्मिती :-**

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | पदांची संख्या |
|---|---|---|---|
| १. | अप्पर जिल्हाधिकारी | पीबी-३ रु.१५,६००-३९,१०० ग्रेड पे-७६०० | २ |
| २. | उप- जिल्हाधिकारी | पीबी-३ रु.१५,६००-३९,१०० ग्रेड पे-५४०० | ४ |
| ३. | तहसिलदार | पीबी-३ रु.१५,६००-३९,१०० ग्रेड पे-५००० | ४ |
| | | **एकूण** | **१० पदे** |

**पद नामात बदल :-**

| अ.क्र. | सध्याचे पदनाम | मंजूर पदे | प्रस्तावित पदनाम बदल |
|---|---|---|---|
| १. | नियंत्रक (अनधिकृत बांधकामे) | १ | अप्पर जिल्हाधिकारी तथा नियंत्रक (अनधिकृत बांधकामे) |
| २. | उप-नियंत्रक (अनधिकृत बांधकामे) | १ | उप-जिल्हाधिकारी तथा उप नियंत्रक (अनधिकृत बांधकामे) |
| ३. | सह-नियंत्रक (अनधिकृत बांधकामे) | २ | तहसिलदार तथा सह-नियंत्रक (अनधिकृत बांधकामे) |

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधीची आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे. "

त्यानंतर, अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

**********